**महामंडळांतर्गत विविध न्यायालयातील प्रकरणे हाताळण्यासाठी जिल्हा न्यायालये, दिवाणी न्यायालये, व इतर न्यायालये येथील महामंडळाच्या पॅनेलवरील वकीलांच्या विधी शुल्कामध्ये सुधारणा करणेबाबत**

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

## प रि प त्र क

**संदर्भ :** महामंडळाचे परिपत्रक जा.क्र.मकृखोविम/काक-१/(६२/२०१३)/७०४०, दि.२७-०८-२०१३.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना महाराष्ट्र अधिनियम १५ सन १९९६ अन्वये झाली आहे. महामंडळाच्या स्थापनेनंतर, महामंडळाने विविध पाटबंधारे प्रकल्पांसाठी संपादीत केलेल्या जमीनीबाबत अधिक भरपाई (enhanced compensation) मागणीसाठी दिवाणी न्यायालयात अनेक प्रकरणे थकित आहेत, तसेच महामंडळाने दाखल केलेली बरीच प्रकरणे/अपिले, जिल्हा न्यायालयात व इतर न्यायालयात थकित आहेत. सदरील प्रकरणे हाताळण्यासाठी/चालविण्यासाठी महामंडळांतर्गत करार तत्वावर वकिलांची नियुक्ती (Panel Advocates) करण्यात आलेली असुन त्यांना सध्या महामंडळाच्या उपरोक्त संदर्भ परिपत्रक दि.२७/०८/२०१३ नुसार विधीशुल्क (Legal Professional fee) मंजुर करण्यात येते. सदरचे विधीशुल्क वाढविणे गरजेचे आहे कारण सदर परिपत्रक अंदाजे साडेपाच वर्षापुर्वीचे आहे, तसेच काही पॅनेल वकिलांनी विधी शुल्क वाढविण्याबाबत मागणी केलेली होती.

सदर विधी शुल्क वाढीबाबत महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दिनांक १३/२/२०१९ रोजीच्या ९९ व्या बैठकीत ठराव निर्णयार्थ सादर केला होता. सदर बैठकीतील पारित झालेल्या **ठराव क्र ९९/११ परिशिष्ट-II** नुसार विविध न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी महामंडळाच्या पॅनेलवरील वकीलांना दिनांक १/०४/२०१९ पासून खाली नमूद केल्यानुसार सुधारीत विधी शुल्क देय राहील.

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क |
|---|---|---|
| १. | **जिल्हा न्यायालय/ दिवाणी न्यायालय (वरिष्ठस्तर) येथील कलम १८ भुसंपादन कायदा १८९४ नुसार संदर्भ (L.A.R)** | |
| | अ) एका प्रकरणासाठी | रु.४०००/- एका प्रकरणासाठी |
| | ब) एका पेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील (Group Matter) तर पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.२०००/-(Group Matter) |
| २. | **दिवाणी न्यायालय (वरीष्ठस्तर)मधील महामंडळाविरुध्द दाखल झालेले दावे** | |
| | अ) रु. १००,०००००/- (रु.१ कोटी) | १५०००/-(रु.१ कोटी पर्यंत) |
| | ब) रु.१कोटी चे पुढे ते रु.१० कोटी पर्यंत | २५०००/- रु.१कोटी चे पुढे ते रु.१० कोटी पर्यंत |

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क |
|---|---|---|
| | क) रु.१० कोटीचे पुढे कितीही कोटी रु. पर्यंत | ३५०००/- रु.१० कोटीचे पुढे कितीही कोटी रु. पर्यंत |
| ३. | **जिल्हा न्यायालय/ दिवाणी न्यायालय {वरीष्ठ स्तर येथील प्रकरणातील अंतरिम अर्ज उदा. मनाई हुकूम इ. (Contested Interim Application)}** | रु.३०००/- |
| ४. | **कामगार न्यायालयातील प्रकरणे** | |
| | अ) एका प्रकरणासाठी | रु.४०००/- एका प्रकरणासाठी |
| | ब) एका पेक्षा जास्त प्रकरणे(Group matter) एकत्र चालणार असतील तर पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.१५००/-(Group matter) |
| ५. | **औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे** | |
| | अ) एका प्रकरणासाठी | ५०००/- एका प्रकरणासाठी |
| | ब) एका पेक्षा जास्त प्रकरणे (Group matter) एकत्र चालणार असतील तर पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.१५००/-(Group matter) |
| ६. | **जिल्हा ग्राहक मंचातील प्रकरणे** | |
| | अ) एका प्रकरणासाठी | रु.४०००/- एका प्रकरणासाठी |
| | ब) एका पेक्षा जास्त प्रकरणे (Group matter) एकत्र चालणार असतील तर पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.१५००/-(Group matter) |
| ७. | **महाराष्ट्र राज्य ग्राहक अॅपलेट कमीशनमधील प्रकरणे** | |
| | अ) एका प्रकरणासाठी | रु.५०००/- एका प्रकरणासाठी |
| | ब) एका पेक्षा जास्त प्रकरणे (Group matter) एकत्र चालणार असतील तर पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.१५००/-(Group matter) |
| ८. | महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधीकरणातील प्रकरणे (मॅट) | |
| | अ) एका प्रकरणासाठी | १५०००/- एका प्रकरणासाठी |
| ९. | **रक्कम वसुलीसाठी दरखास्त प्रकरणे (महामंडळातर्फे दाखल किंवा महामंडळा विरुध्द दाखल झालेली) (Execution Petition Recovery of Decreed Amount by or against MKVDC)** | |

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क |
|---|---|---|
| | अ) एका प्रकरणासाठी | रु.२५००/- एका प्रकरणासाठी |
| | ब) एका पेक्षा जास्त प्रकरणे (Group matter) एकत्र चालणार असतील तरपुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.५००/-(Group matter) |
| १०. | **कलम ८० दिवाणी प्रक्रिया संहिता(Sec.८० CPC) किंवा इतर प्रकरणी नोटीसीना(Any Legal Notices) कायदेशीर उत्तर तयार करणे.** | |
| | अ) एकापेक्षा जास्त नोटीसा जर एकच विषयासंदर्भात, अनेक असतील तर पहिल्या नोटीसच्या कायदेशीर उत्तरासाठी. | रु.१०००/- पहिल्या नोटीसच्या कायदेशीर उत्तरासाठी. |
| | ब) पुढील प्रत्येक नोटीसीचे उत्तर देण्यासाठी. | रु.१००/- प्रत्येक नोटीसीचे उत्तर देण्यासाठी. |
| ११. | **खाजगी वाटाघाटीनी जमीन खरेदी करणे व खरेदी खत तयार करणे** | रु.२०००/- प्रती खरेदी खत |
| १२. | **जमीनीच्या एक गट क्रमांकाबाबत शोध अहवाल (Title Search Report) तयार करणे.(शोधणावळ फी यात अंतर्भूत आहे.)** | ५०००/- एक गट क्रमांकाबाबत शोध अहवाल. (शोधणावळ फी यात अंतर्भूत आहे.) |
| १३. | **उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालय यांनी पेपरबुक तयार करण्याचा हुकुम केल्यानंतर पेपरबुक तयार करण्यासाठी संबंधीत कार्यालयास मार्गदर्शन करणे.** | १५००/- |

वरील विधी शुल्का पैकी ५०% विधी शुल्क सुरुवातीला व उर्वरित ५०% विधी शुल्क प्रकरण अंतिमत: गुणवत्तेवर निकाली निघाल्यानंतर किंवा इतर कारणामुळे अंतिमत: संपल्यानंतर (Decided on merit or Disposed off otherwise) अदा करण्यात येईल.

Admission च्या वेळी प्रकरण निकाली निघाले तर संपुर्ण विधी शुल्क देय राहील.

(स्वाक्षरी) २७/५/१९

**(रा.ल.भोपळे)**
**उपविभागीय अभियंता**
**म.कृ.खो.वि.म.,पुणे ११**

जा.क्र.मकृखोविम/काक-२/(२९/२०१८)/८९७
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
सिंचन भवन, बारणे रोड, पुणे-११
दिनांक : २७/०५/२०१९

स्थळ प्रत मा. का. सं. यांना मान्य असे.

प्रत : मुख्य अभियंता (जसं/वि.प्र), जलसंपदा विभाग, पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
प्रत : मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी
प्रत : अधीक्षक अभियंता / अधीक्षक अभियंता व प्रशासक (महामंडळांतर्गत सर्व) यांना माहितीसाठी.
प्रत : कायदा सल्लागार, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी.
प्रत : उपविभागीय अभियंता (कायदा कक्ष) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत : प्रकल्प शाखा / आस्थापना शाखा / भांडार शाखा / रेखा शाखा / लेखा शाखा (महामंडळ कार्यालय) यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी
प्रत : परिपत्रक धारिका सन २०१९ साठी.